राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून स्टेमी प्रोजेक्ट अंमलबजावणीसाठी आवश्यक औषधे खरेदीसाठीच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०५१९/प्र.क्र.३३३/आरोग्य-७
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. प्रशामा-०५१९/प्र.क्र.३३३/आरोग्य-७, दिनांक १६ जुलै, २०१९.

२) सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/NCD/न.क्र. ३७९-१/STEMI Project/प्र.मा./शुध्दीपत्रक/२०९६-९७, दिनांक ३१ जुलै, २०१९.

३) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची मान्यता दिनांक ३० जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून राज्यातील १० जिल्ह्यात स्टेमी प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे. त्यानुषंगाने आवश्यक औषधे खरेदी करण्यासाठी उपरोक्त संदर्भिय दि.१६/०७/२०१९ शासन निर्णयाअन्वये अंदाजित रक्कम रु.३०९.९७ लक्ष इतक्या रकमेच्या खरेदी प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदर प्रकरणी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मंजूर कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत प्राप्त अनुदानातून राज्यातील पुणे, ठाणे, अमरावती, औरंगाबाद, नांदेड, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, रत्नागिरी व सोलापूर अशा एकूण १० जिल्ह्यात स्टेमी प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे. त्याकरीता आवश्यक औषधे अंदाजित रक्कम रु.३०९.९७ लक्ष इतक्या रकमेच्या खरेदी प्रस्तावास उपरोक्त संदर्भिय दि.१६/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये

प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. तथापि, सदर प्रकरणी स्टेमी प्रोजेक्ट तज्ञांच्या बैठकीत झालेल्या औषध खरेदीबाबतच्या निर्णयानूसार प्रस्तावित करण्यात आलेल्या औषधांच्या प्रकार व खरेदी संख्या यात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने सहसंचालक, आरोग्य सेवा (असंसर्गजन्य रोग), मुंबई यांनी केलेल्या विनंतीनूसार प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी खालील विवरणपत्रात नमूद केल्यानूसार पुढील अटींच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ- अनुदानाचा तपशिल

Sr. no	FMR Code	Name of Head	Approved Budget in PIP in 2019-20 (In Lakhs)	Procurement Proposal (In Lakhs)
1	FMR Code 6.2.19.1	Drugs & Supplies for District NCD Clinic	658.00	309.97

ब- प्रस्तावित खरेदीचा तपशिल

Sr. No	**Name of the drugs**	**Unit Cost Approx. (Rs.)**	**Quantity**	**Total cost Approx. (Rs.)**
1	**Inj.Streptokinase 7.5 lakhs/ Vial**	796.32	8500	6768720
2	Inj. Tencetaplase (TNK TPA) 50 mg	28600	250	7150000
3	**Inj. Reteplase 10 IU**	22160	500	11080000
	Sub Total (A)			**2,49,98,720**
4	Inj. Heparin 5000 IU/ml	35.93	56250	2021063
5	Tab Aspirin 75mg	0.21	150000	31500
6	Tab Clopidrogel 75mg	0.61	150000	91500
7	Tab Sorbitrate 5 mg	0.75	75000	56250
8	Inj. Morphine 10 mg	25	37500	937500
9	Enalpril 5 mg	0.26	168750	43875
10	Tab Metaprolol 50	0.578	168750	97538
11	Tab Atrovastatin 40	17	150000	2550000
12	Inj. Xylocard 2%	1	10000	10000
13	Inj. Amiodarone 50mg/ml	16	10000	160000
	Sub Total (B)			**5999226**
	Grand Total (A + B)			**3,09,97,946**

अटी:-

१) सदर औषधी सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू औषधी सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे GEM Portal, इतर राज्यांचे दरकरार, National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) यांच्याकडील उपलब्ध असलेल्या न्युनत्तम दर विचारात घेण्यात यावेत. तसेच हाफकिन संस्थेतील सदर बाबींची खरेदी केली जात असल्यास अथवा झालेली असल्यास निविदेत प्राप्त झालेले न्युनत्तम दर विचारात घेऊन त्या दरांना अंदाजित दर म्हणून गृहित धरण्यात यावे व त्यानूसार निविदेकरीता मागणी नोंदवितांना औषधी, औषधी साहित्य व उपकरणांच्या संदर्भात अंदाजित दर म्हणून नोंदविण्यात यावेत व खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कृती आराखडयामध्ये NPCDCS कार्यक्रमांतर्गत स्टेमी प्रोजेक्ट अंमलबजावणीकरीता FMR Code ६.२.१९.१ अंतर्गत Drugs & Supplies for District NCD Clinic रु.६५८.०० लक्ष इतक्या मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी -२०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201909161904539517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Milind Raghunath Kulkarni

Digitally signed by Milind Raghunath Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=438fa70bb728385b5c81bde24450c11d5ce0d99ed18a61fb5b1685722e2c2c03, cn=Milind Raghunath Kulkarni
Date: 2019.09.18 13:01:19 +05'30'

(मिलिंद कुळकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)